५३/प.वि

क्रमांक — सीएसएल-२०१३/प्र.क्र.८२६/१५-स,
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शिबीर कार्यालय, नागपुर,
दिनांक - १६.१२.२०१३.

## परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ अन्वये विवरणपत्रे दाखल करणेबाबत.**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (१A) अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने वित्तीय वर्ष समाप्त झाल्यानंतर सहा महिन्याच्या आत संबंधित निबंधकास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडे खालील विवरणपत्रे दाखल करणे बंधनकारक आहे.

अ) संस्थेच्या कार्याचा वार्षिक अहवाल.
ब) संस्थेच्या लेख्यांची लेखापरिक्षित विवरणे.
क) संस्थेच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्याप्रमाणे शिल्लक रकमेचा विनियोग करण्यासाठीच्या योजना.
ड) संस्थेच्या उपविधीच्या सुधारणांची यादी, (असल्यास).
इ) संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा घेण्याची तारीख व नियत असेल तेथे निवडणुक घेण्याच्या दिनांका संबंधात प्रतिज्ञापन.
फ)अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार निबंधकास आवश्यक वाटेल अशी इतर माहिती.

कलम ७९ (१B) नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने शासनमान्य नामिकेतुन सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकाचे किंवा लेखापरिक्षण व्यवसाय संस्थेचे (Firm) नाव व त्याचे लेखी संमतीपत्र याबाबतचे विवरण वार्षीक सर्वसाधारण सभेच्या दिनांकापासुन एक महिन्यात निबंधकास सादर करणे आवश्यक आहे.

कलम ७९ (१A) व कलम ७९ (१B) नुसार विवरणपत्रे सादर करणेबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

### विवरणपत्रे सादर करण्याबाबतची कार्यपध्दती —

विवरणपत्रांचे नमुने सहकार विभागाच्या https://mahasahakar.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली आहेत. प्रत्येक सहकारी संस्थेने संकेतस्थळावरील या विवरणपत्रात माहिती अचुकरीत्या भरुन ही सर्व विवरणपत्रे या संकेतस्थळाव्दारे संबंधित निबंधकास प्रत्येक वर्षी दि.३० सप्टेंबर पर्यंत ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात सादर (अपलोड) करावयाची आहेत. तसेच कलम ७९ (१B) मधील माहिती संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर एक महिन्यात वरील संकेतस्थळाव्दारे संबंधित निबंधकास सादर (अपलोड) करावयाची आहे.

याबाबत अधिक स्पष्ट करण्यात येते की, सहकारी संस्थांनी वरील सर्व विवरणपत्रे विभागाच्या संकेतस्थळावरच ईलेक्ट्रॉनिक स्वरुपात सादर (अपलोड) करावयाची असुन संकेतस्थळावर विवरणपत्रे सादर न केल्यास संस्थेने विवरणपत्रे सादर केलेली नाहीत, असे गृहित धरण्यात येईल.

ज्या सहकारी संस्था विवरणपत्रे विहित नमुन्यामध्ये व विहित मुदतीत विभागाच्या संकेतस्थळावर सादर (अपलोड) करणार नाहीत अशा संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३CA, १४६ (G) व १४७ (G) अन्वये कारवाईस पात्र ठरतील. कलम ७३CA मध्ये समिती आणि तिच्या सदस्यांच्या अपात्रतेबाबत तरतुद असुन कलम १४६ (G) नुसार चुकीचे विवरणपत्र दाखल करणे अथवा कलम ७९ नुसार विवरणपत्र दाखल न करणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. कलम १४७ (G) नुसार या गुन्हयासाठी रुपये ५००० पर्यंत दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे.

वरील प्रमाणे निबंधकाने त्यांच्या कार्यक्षेत्रातील किती संस्थांनी विवरणपत्रे दाखल केली आहेत याबाबत ऑगष्ट व सप्टेंबर या महीन्यात प्रत्येक आठवडयाला संकेतस्थळाव्दारे आढावा घ्यावा. ज्या संस्था विहीत कालावधीत विवरणपत्रे सादर करणार नाहीत त्यांच्या संदर्भात निबंधकाने वरील तरतुदींनुसार कायदेशीर कार्यवाही करावी.

**विवरणपत्रांची छाननी –**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९ (४) अनुसार निबंधकाने अथवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने सदर विवरणपत्रांची छाननी करुन त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावयाची आहे. कलम ७९ (१A) मधील अ, ब व क मधील विवरणपत्रांची निबंधकाच्या वतीने प्राधिकृत केलेल्या संबंधित लेखापरीक्षकाने छाननी करुन त्याबाबतचा अहवाल स्वयंस्पष्ट अभिप्रायासह संबंधित निबंधकाकडे दि. ३१ डिसेंबर पूर्वी सादर करावा. ही छाननी तालुका स्तरीय संस्थांच्या बाबतीत संबंधित तालुक्याचे लेखापरिक्षक यांनी, जिल्हा स्तरीय संस्थांच्या बाबतीत जिल्हा विशेष लेखापरिक्षक यांनी, विभागीय संस्थांच्या बाबतीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) यांनी व राज्यस्तरीय संस्थांच्या बाबतीत अप्पर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण) यांनी करावयाची आहे. साखर आयुक्त, पणन संचालक, संचालक हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोदयोग तसेच आयुक्त पशुसंवर्धन व आयुक्त दुग्ध विकास यांच्या अखत्यारितील संस्थांच्या बाबतीत ही छाननी संबंधीत लेखापरिक्षकांनी करावयाची आहे. उर्वरित ड, इ, फ मधील विवरणपत्रांची छाननी संबंधित निबंधक त्यांचे स्तरावर करतील. छाननी केल्यानंतर निबंधकाने कलम ७३CA, कलम १४६ (G) व कलम १४७ (G) नुसार संबंधित संस्थेवर आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी.

कलम ७९ (१B) अनुसार शासनमान्य नामिकेवरील लेखापरीक्षकांची नेमणूक व त्यांची लेखी संमती याबाबतचे विवरणपत्र संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा झाल्यानंतर एक महिन्याचे आत दाखल करणे बंधनकारक आहे. त्यानुसार संस्थेने कार्यवाही न केल्यास निबंधकाने दि.३० नोव्हेंबर पर्यंत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (१)(A) च्या पहिल्या परंतुका अन्वये संबंधित संस्थेचे लेखापरीक्षण करणेसाठी नामिकेवरील लेखापरीक्षकाची नियुक्ती करावी व सदरचा नियुक्ती आदेश विभागाच्या संकेतस्थळावर सादर (अपलोड) करावा.

वरील सुचनांचे सर्व संबंधितांनी काटेकोरपणे पालन करुन योग्य ती कार्यवाही करावी.

(राजगोपाल देवरा)
सचिव (सहकार), महाराष्ट्र शासन,

प्रत, माहितीस्तव सादर –

१. मा. मंत्री, (सहकार), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. मंत्री, (कृषी व पणन), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, (वस्त्रोदयोग), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, (पशुसंवर्धन व दुग्ध विकास), यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री, (सहकार, पणन व वस्त्रोदयोग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी –

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य , पुणे,
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३. आयुक्त, दुग्ध विकास, मुंबई.
४. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य , पुणे,
५. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोदयोग, महाराष्ट्र राज्य , नागपुर,
६. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
८. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरिक्षण), (सर्व)
९. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१०. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व),
११. उप/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, (सर्व),